**असुधारित प्रत**

# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक ११ मार्च, २०१५
## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय.**

**दोन : प्रश्नोत्तरे.**

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.**

**चार : लक्षवेधी सूचना - (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

**(मंगळवार, दिनांक १० मार्च, २०१५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) - (क्रमांक १ ते ४) -**

(१) **सर्वश्री. संजय दत्त,** अशोक ऊर्फ भाई जगताप, शरद रणपिसे, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री. धनंजय मुंडे, दिपकराव साळुंखे, अमरसिंह पंडित, सुनिल तटकरे, जयवंतराव जाधव, किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री. नरेंद्र पाटील, हेमंत टकले, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री. आनंद ठाकूर, सतीश चव्हाण, अनिल भोसले, डॉ. अपूर्व हिरे, सर्वश्री. जगन्नाथ शिंदे, ख्वाजा बेग, विक्रम काळे, ॲड. राहूल नार्वेकर**,** श्री.प्रकाश गजभिये, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीचे अर्ध्वयू डॉ.नरेंद्र दाभोळकर यांची हत्या होवून एक वर्ष उलटले तोच पुरोगामी महाराष्ट्रात दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी कोल्हापूरचे कष्टकरी वर्गाचे नेते व डाव्या चळवळीचे पितामह कॉ.गोविंदराव पानसरे आणि त्यांच्या पत्नीवर अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्या घराजवळच गोळ्या घालून हल्ला करणे, त्यात पानसरे व त्यांच्या पत्नी उमा दोघे जबर जखमी होणे, दिनांक २० फेब्रुवारी, २०१५ रोजी मुंबईतील ब्रिच कॅन्डी हॉस्पिटलमध्ये उपचाराच्या दरम्यान कॉ.गोविंदराव पानसरे यांचे निधन होणे, ब्रिच कॅन्डी हॉस्पिटलमधून त्यांचे पार्थिव विमानतळावर नेल्यानंतर आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता त्यांच्या कुटुंबियांनाच करावी लागल्याने सुमारे २ तास विलंब होणे, कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी कुटुंबियांकडून पोलिसांनी पैशाची मागणी करण्याचा घडलेला संतापजनक प्रकार, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या विमानतळावर असणाऱ्या प्रोटोकॉलच्या अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे कै.पानसरे यांच्या

कुटुंबियांना अनेक अडचणी व यातना भोगाव्या लागणे, तसेच डॉ.दाभोळकर व कॉ.पानसरे यांच्या मारेकऱ्यांना अद्यापही अटक करण्यास राज्यशासनास आलेले अपयश, राज्यातील विविध भागांतून सदर घटनेंच्या विरोधात तीव्र प्रतिसाद उमटत असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा निर्माण झालेला प्रश्न, राज्यात वाढीस लागले गुन्हे हा चिंतेचा प्रश्न बनणे, राज्य शासनाने सदर घटनेतील मारेकऱ्यांना लवकरात लवकर अटक करुन राज्यात वाढत चाललेल्या गुन्ह्यांना आळा बसण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **ॲड. अनिल परब, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"शाळा-महाविद्यालये, न्यायालये, रुग्णालये यांच्या शंभर मीटरपर्यंतच्या परिसरात शांतता क्षेत्र जाहिर करण्यात येऊनही त्याची योग्यपणे अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास येणे, वाहनांची गर्दी, फटाके, बेंजो, कारखाने इ. मुळे तसेच लोकसंख्येमुळे होत असलेल्या गोंगाटात अधिकच भर पडून त्यांच्या आवाजामुळे येत असलेले तात्पुरते बहिरेपण, अस्वस्थता, तणाव तसेच सतत डोकेदुखी, उच्च रक्तदाब, ह्रदयाचे असंबध्द ठोके, मानसिक अनारोग्य असे दुष्परिणामही आवाजामुळे होत असल्याने शहरांतील ध्वनीची पातळी मोजून ती कमी करण्यासाठी उपाय सुचवणारी सल्लागार समिती नेमण्यास मिळालेली मंजूरी, तब्बल १२०० ठिकाणी ध्वनीची नियमित नोंद केली जात असतांनाही याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(३) **सर्वश्री. सुनिल तटकरे,** किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे, हेमंत टकले, नरेंद्र पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री.धनंजय मुंडे, अनिल भोसले, जयवंतराव जाधव, दिपकराव साळुंखे, सतिश चव्हाण, ख्वाजा बेग, आनंद ठाकूर, ॲड.राहूल नार्वेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ऊर्जा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"नैसर्गिक वायु अभावी बंद पडलेल्या दाभोळ (जि.रत्नागिरी) येथील रत्नागिरी गॅस अँड पॉवर प्रा.लि. ची महावितरणकडे असलेली रुपये दोन हजार कोटींची थकबाकी, सदर वीज प्रकल्पास रिलायन्स कंपनीकडून होणारा वायुचा पुरवठा बंद होणे, परिणामी अडीच वर्षापूर्वी १६०० मेगावॅट वीज निर्मिती करणारा वीज प्रकल्प सुमारे दीड वर्षांपासून

बंद असणे, वीज उत्पादन होत नसल्याने महावितरणकडून मिळणारा देखील महसूल बंद होणे, एक युनिट वीज मिळत नसल्याने स्थिर आकाराची रक्कम देण्यासही महावितरणने दिलेला नकार, सदर प्रकल्प बंद असल्याने सुमारे १० हजार कोटींचे कर्ज देणाऱ्या बँका आर्थिक अडचणीत सापडणे, दाभोळ येथील नैसर्गिक वायू टर्मिनलवर डोळा ठेवून रत्नागिरी गॅस अँड पॉवर प्रा.लि. प्रकल्प एका मोठ्या खाजगी कंपनीने चालविण्यास दाखविलेली अनुकूलता याकरिता केंद्र शासनाने कायद्यात केलेले प्रस्तावित बदल, याप्रकरणी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"खामगांव, जि.बुलढाणा येथील सामान्य रुग्णालयात पुरेशा आणि अत्यावश्यक वैद्यकीय सुविधा व तज्ञ डॉक्टरांच्या अभावामुळे उपचारांसाठी येणाऱ्या रुग्णांची प्रचंड गैरसोय होत असल्याची नुकतीच उघडकीस आलेली घटना, सदरहू रुग्णालय हे बुलढाणा जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाचे आकाराने आणि नावाने मोठे रुग्णालय असल्यामुळे येथे दररोज शेकडो रुग्णांची उपचार घेण्यासाठी गर्दी होणे, हे रुग्णालय महामार्गावर असल्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नित्याने होणाऱ्या अपघातातील जखमींना उपचारासाठी दाखल करण्यात येणे, परंतू या रुग्णालयात अत्यावश्यक वैद्यकिय सुविधा, यंत्रे व तज्ञ डॉक्टर नसल्याने अपघातातील जखमींवर प्रथमोपचार करुन पुढील उपचारासाठी अकोला येथे पाठविण्यात येणे, जवळच्या तालुक्यातील रुग्णांना चांगल्या आणि अत्यावश्यक उपचारासाठी खामगांव सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आल्यावर प्रथमोपचाराशिवाय कोणताही मोठा ईलाज होत नसल्याने रुग्णांना अकोला येथे जावे लागत असल्यामुळे अनेक रुग्णांना प्राणास मुकावे लागणे, तसेच स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर कार्यरत नसल्यामुळे गर्भवती महिलांना खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागणे, या रुग्णालयाला उप जिल्हा रुग्णालयाचा दर्जा असूनही आवश्यक वैद्यकीय सुविधा व डॉक्टर्स नसल्यामुळे रुग्णालय प्राथमिक आरोग्य केंद्रासारखे ठरले असून रुग्णांची होणारी गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने रुग्णालय सर्व सोईंनी युक्त करण्यासाठी तज्ञ डॉक्टरांची तात्काळ भरती करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका."

**पाच : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

**असुधारित प्रत**

# - मध्यंतर -

**सहा : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस).**

**सात : सर्वश्री.अमरसिंह पंडित,** सतिश चव्हाण, अनिल भोसले, जयवंतराव जाधव, प्रकाश बिनसाळे, ॲड. राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. प्रकाश गजभिये, हेमंत टकले, दिपकराव साळुंखे, राजेंद्र जैन, संदिप बाजोरिया, ख्वाजा बेग, किरण पावसकर, जगन्नाथ शिंदे, नरेंद्र पाटील, आनंद ठाकूर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री. रामराव वडकूते, प्रभाकर घार्गे, **वि.प.स.** यांनी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १८३ व म.वि.प.नियम ११ अन्वये दिलेला पुढील प्रस्ताव मांडण्यास परवानगी देणे -

"महाराष्ट्र विधानपरिषदेचे मा.सभापती यांनी सभागृहाचा विश्वास गमावला असल्याने त्यांना सभापती पदावरुन दूर करण्यात यावे."

**आठ : (मंगळवार, दिनांक १० मार्च, २०१५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) -**

**श्री. पांडुरंग फुंडकर,** ॲड.अनिल परब, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर**, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"राज्यात ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१४ व फेब्रुवारी, २०१५ मध्ये झालेला अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे खरीप व रब्बी पिकांची झालेली हानी, त्यामुळे शेतकऱ्यांवर ओढवलेले आर्थिक संकट, शासनाने राज्यभर झालेल्या पिकांच्या हानीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांसाठी दिलेले रुपये ४,२०० कोटींचे आर्थिक सहाय्य व त्याचे सुरू केलेले वाटप, शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई देण्यासाठी आणखी निधीची असलेली आवश्यकता, त्यासाठी शासनाने केंद्र शासनाकडे सुरू केलेले प्रयत्न, राज्यात सातत्याने उद्‌भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीवर कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून शेती विषयक हवामान अंदाजाच्या आधारे राज्यात पिक विमा योजना सुधारित पध्दतीने लागू करण्याची आवश्यकता, शेतकऱ्यांना जमीन आरोग्य पत्रिकांची (सॉईल हेल्थ कार्ड) अंमलबजावणी करण्याची गरज, ठिबक सिंचन पध्दतीचा प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी अनुदान वाढविण्याची शेतकऱ्यांची मागणी, शेतकऱ्यांना बी-बियांणे व खतांचा पुरवठा नियमित करण्यासाठी नियोजन करुन नियंत्रित दराने व सुलभतेने त्याचा पुरवठा करण्याची आवश्यकता, राज्य दुष्काळ मुक्त होण्यासाठी नियोजन करण्याची, जलयुक्त शिवार अभियान राबविण्याची

तसेच कृषी सौरपंप उपलब्ध करुन देणे, इ.सुविधा देण्याची आवश्यकता व शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**नऊ : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री.अमरसिंह पंडित व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

जात प्रमाणपत्रासह अनेक शासकीय कामकाजासाठी शालेय अभिलेख पुरावा म्हणून वापरण्यात येणे, शासनाने मराठा समाजाला आरक्षण दिल्यानंतर जात प्रमाणपत्रासाठी सन १९६५ पूर्वीच्या पुराव्यासाठी शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्राची मागणी प्राधिकृत अधिकाऱ्यांनी करणे, अनेक शाळा महाविद्यालयात शैक्षणिक अभिलेख्यांचे जतन सुस्थितीत न केल्यामुळे असे पुरावे मिळण्यास अडचणी निर्माण होणे, शालेय अभिलेख्यांच्या प्रमाणित प्रतीसाठी आणि अभिलेख्यामध्ये साम्य येणाच्या दृष्टीने जात, धर्म, जन्मस्थळ, दिनांक यांसह इतर बाबींबाबत नियम करण्याची आश्यकता असणे, शैक्षणिक अभिलेख्यांचे सुस्थितीत जतन करण्यासाठी त्याचे संगणकीकरण करणे याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना.

**(२) श्री.जयवंतराव जाधव व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय व जिल्हा रुग्णालय नाशिक येथे पदव्युत्तर महाविद्यालय सुरु करणेसाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने पाठविलेला प्रस्ताव प्रलंबित असणे, नाशिकमध्ये आरोग्य विज्ञान विद्यापीठ ही वैद्यकीय क्षेत्रातील सर्वोच्च संस्था असूनही येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसणे, सदर पी. जी. इन्स्टिट्युट सुरु करणेसाठी शासनाने तातडीने "आवश्यक प्रमाणपत्र" निर्गमित करुन नाशिकमध्ये पदव्यूत्तर महाविद्यालय सुरु करण्याची आवश्यकता व याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

**विधान भवन,**
मुंबई ,
दिनांक : १० मार्च, २०१५.

**उत्तमसिंग चव्हाण,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.